# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
## Question paper 2022-23

**STD: VII** **Marks -४०**
**SUB:Marathi** **Time – 2 Hrs.**

---

**प्र१.ला.अ)खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे द्या.** **(४)**

हवामानातला बदल जाणवायला लागला आहे. थंडी निरोप घेता घेता उत्तररात्रीपुरती सोबत करते आहे आणि दिवसा उन्हाळ्याची ललकारी देणारी उन्हाची तीव्रता चटके देऊ लागली आहे. एकीकडे पतझड सुरू आहे. अंगण, रस्ते पिवळ्याधम्मक पण वाळक्या पानांनी भरून जाताहेत. दुसरीकडे अशोकाची, वरूणाची, शिरिषाची अशी कितीक झाडं तेजस्वी पालवीनं झगमगून उठताहेत. आंब्याचा मोहोर, कोकिळाच्या लकेरी, उसाची गुळं, कलिंगडाचे ढीग, द्राक्षांचे घोस - ही सगळीच वसंत ऋतूच्या स्वागताची चाहूल, खरोखरीच मला मोहरून टाकते आहे. वारासुद्धा बदलल्यासारखा वाटतो आहे. निसर्गानं घेतलेलं हे वळण आहे. या ऋतुबदलाला साजेसे काही सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम याच दिवसांत साजरे होतात. माझं मन या ऋतूमधल्या नव्या वळणाबरोबर धुमारल्यासारखं चैतन्यमय झालं आहे. पण या चैतन्याला नकोसे धार्मिक, सांस्कृतिक रंग चढवले जाताहेत या जाणिवेनं मी अस्वस्थ होते आहे.

प्रश्न -१) ऋतू बदलांच्या या दिवसात काय साजरे केले जातात
२) लेखकाला काय मोहरून टाकते आहे-
३) लेखक कोणत्या जाणिवेने अस्वस्थ होत आहे?
४) तेजस्वी पालवीने झगमगून उठणारी झाडे कोणती?

**ब) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे द्या.** **(४)**

1 नोव्हेंबर 1956 ला भारत सरकारने या द्वीपसमूहाला केंद्रशासित प्रदेश जाहीर केले. 1980पासून अंदमान या बेटाचा पर्यटन स्थळ या दृष्टीने विकास केला आहे. परिणाम स्वरूप निसर्गसौंदर्याने नटलेल्या या रम्य बेटाला दरवर्षी हजारो पर्यटक भेट देतात. अंदमान बेट हे 6408 चौरस किमी मध्ये पसरलेले आहे. पैकी 80 टक्के क्षेत्र हे जंगलाने व्याप्त आहे व अंदाजे 50 टक्के भाग आदिवासी जमाती राष्ट्रीय उद्यान व वन्य प्राणी संरक्षण क्षेत्र म्हणून राखीव आहे.

प्रश्न -१) पर्यटन स्थळ म्हणून कोणत्या बेटाचा विकास केला आहे?
. २) 1 नोव्हेंबर 1956 ला भारत सरकारने द्वीपसमूहाला दिलेले नाव-
३) 80% चौरस क्षेत्र हे याने व्यापलेले आहे-
४) संरक्षण क्षेत्र म्हणून राखीव क्षेत्र या भागांसाठी आहे-

**प्र.२.अ) थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन).** **(४)**

१) कॅप्टन अनुजची शैक्षणिक कारकीर्द लिहा.
२) मंगळागौरीचे खेळ कसे खेळले जातात?
३) निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय कराल?

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन).** **(३)**

१) कॅप्टन अनुजला कोणत्या पुरस्काराने गौरविण्यात आले?
२) निसर्ग आपल्याला कोणत्या गोष्टी पुरवीत असतो.

३) लगोरी या खेळात किती संघाचे आवश्यकता असते?
४) अनुजच्या आई वडिलांचे नाव काय?

**क) खालील कवितेच्या ओळींचा अर्थ लिहा.** **(२)**

१) साऱ्यांना आश्रय देई सहनशील धरणीमाता
मेघ, पक्षी, चंद्राला प्रिय गगनाची विराटता!!

**प्र.३.अ) कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **(२)**

१)"तो लढता लढता धारातीर्थी पडला ना."
२)"तुमचा मुलगा आहे मी,हरायचा विचारही करू शकत नाही"

**ब) कंसातील शब्द योग्य ठिकाणी रिकाम्या जागी भरा.** **(३)**

(पारंपारिक, ऋणी, उब)

१) संपूर्ण देश तुमच्या मुलाचा ________राहील.
२) लगोरी हा एक भारतातील _________खेळ आहे.
३) प्रकाश____ देताना भेदभाव न करता.

**क) खालील वाक्यप्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.** **(२)**

| अ. | ब |
|---|---|
| १) उर भरून येणे | लढता लढता मृत्यू येणे |
| २) धारातीर्थी पडणे. | हरवणे |
| | अभिमान वाटणे |

**प्र.४.अ) समानार्थी शब्द लिहा.(कोणतेही दोन )** **(२)**

१) प्रांत- २) संघ- ३) उब-

**ब) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन.)** **(२)**

१) राजा × २) थोडा ×. ३) अंधार ×

**क) वचन बदला. (कोणतेही दोन).** **(२)**

१) गाणे - २) तोफ -. ३) सेना -

**प्र.५.अ) खालील वाक्यातील विशेषण ओळखून त्याचे प्रकार ओळखा.** **(३)**

१) सैनिकांनी प्राणांची बाजी लावली.
२) गावापासून पाचशे मीटर लांब वस्ती आहे.
३) त्या शहरात वाहनांची सोय नाही.

**ब) खालील वाक्याचा काळ ओळखा.** **(२)**

१) रोजच सूर्य येतो.
२) सैनिकांनी अनेक बंकर बांधले होते.

**क.) खालीलपैकी कोणतीही एक कृती करा.** **(५)**

१) निबंधलेखन - निसर्ग रुसला तर.......
२) पत्रलेखन - गणपतीच्या सजावटीसाठी सजावटीचे सामान मागवण्यासाठी 'रोषणाई सजावट भांडार' या कंपनीच्या व्यवस्थापकांना मागणी पत्र लिहा.